# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
## विशेष भरती मोहिमे अंतर्गत अपंग संवर्गातील पदांच्या भरतीसाठी जाहिरात

**(कार्यालय, अपर आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, नागपूर)**

महाराष्ट्र शासनाच्या, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे कार्यक्षेत्रातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हया जिल्हयातील सात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत शासकीय आश्रम शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, शासकीय वसतीगृहे खालील रिक्त पदाकरिता पात्र अपंग उमेदवारांकडून पदांसमोर दर्शविलेल्या राखीव संवर्गाकरिता **दिनांक २६.०९.२०११** पर्यंत अर्ज विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | पदांची संख्या/ जातीचा प्रवर्ग | अपंगत्वाचे निकष | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| | | **अपंग** | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | **कार्यालय, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर**<br>**अर्ज करण्याचे ठिकाण : अपर आयुक्त, आदिवासी विकास, आर. टी. ओ. कार्यालयासमोर, अमरावती रोड, गिरीपेठ नागपूर.** | | |
| १. | गृहपाल (स्त्री)<br>९३००-३४८००+ ग्रे.वे. ४३०० | १<br>**अ.जमाती करिता राखीव** | अल्पदृष्टी (Partially Sighted) किंवा अस्थीव्यंग(Orthopedic Handicapped) | समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी. |
| २. | ग्रंथपाल<br>५२००-२०२०० + ग्रे.वे. २४०० | १<br>**अ.जाती करिता राखीव** | अल्पदृष्टी (Partially Sighted) किंवा अस्थीव्यंग (Orthopedic Handicapped) किंवा अल्प बहिरी व्यक्ती (Partially Deaf) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण, ग्रंथालय प्रशिक्षण या मधील शासन मान्यता प्राप्त महाविद्यालयाचे अथवा संस्थेचे प्रमाणपत्र धारण, करीत असलेले, ग्रंथालय शास्त्र या मधील पदविका धारण करणा-या आणि किमान दोन वर्षापेक्षा कमी नाही इतका ग्रंथालय कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना पसंतीक्रम राहील. |

## -: सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१. अर्जदार भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असणे आवश्यक आहे.

२. शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असणा-या व्यक्तीने त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत विहीत केलेल्या दिनांका पर्यंत पाठवावेत.

३. पदांच्या संख्येत बदल करण्याचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबधित कार्यालयास राहील.

४. अर्जदाराने अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात (गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, असल्यास जातीचे वैधता प्रमाणपत्र, सक्षम प्राधिका-यांने दिलेले कायम पणाचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र, निदान प्रमाणपत्र, सेवायोजन कार्यालयाचे प्रमाणपत्र, एमएससीआयटी प्रमाणपत्र इत्यादी )

५. उमेदवाराची २०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यांत येईल व २५ गुणांची मौखिक परीक्षा घेण्यांत येईल.

६. आवेदन पत्र अस्विकार करण्यास, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल तसेच अंतिम निर्णय याबाबतचे संपूर्ण अधिकार संबधित कार्यालयास राहील.

७. उमेदवाराला लेखी परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा प्रवास खर्च दिल्या जाणार नाही.

८. जाहिरातील अंतिम मुदतीचे दिनांकास उमेदवाराची किमान वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण व कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

९. अर्ज सर्व दृष्टीने पूर्ण व पूढील नमुन्यात असणे आवश्यक आहे. नमुन्यात नसलेला व संपूर्ण नसलेला व आवश्यक असलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती अर्जासोबत न जोडल्यास अर्ज फेटाळण्यात येईल.

2/..

१०. नमुन्यात व परिपूर्ण असलेला अर्ज अपर आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ नागपूर यांच्या नावाने वरील तक्त्यात दिलेल्या पत्यावर **दिनांक २६.०९.२०११ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून)** स्विकारल्या जातील तसेच पोस्टाद्वारे पाठविण्यात येणारे अर्ज **दिनांक २६.०९.२०११ रोजी सांय ५.४५ वाजतानंतर** येणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

११. सदरहू जाहिरात अपंगाचा अनुशेष भरुन काढण्याकरिता प्रसिध्द करण्यात येत आहे. फक्त याच जाहिरातीस प्रतीसाद देऊन ज्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त होतील, केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील, यापूर्वी या कार्यालयात अपंग उमेदवरांचे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१२. अपंग उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने उमेदवार संबधित पदावर काम करण्यास सक्षम असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करण्यात येईल.

१३. उमेदवाराने सुवाच्च अक्षरात स्वत:चा पत्रव्यवहाराचा पत्ता असलेला १० से.मि.x २२ से.मि. आकाराचा लिफाफा रुपये ५/- ची पोस्टाची तिकीट लावून अर्जासोबत जोडावा.

१४. लेखी परीक्षेचा दिनांक व स्थळ स्वतंत्ररित्या पत्राद्वारे कळविण्यात येईल. वरील पदांची परीक्षा एकाच ठिकाणी व एकाच दिनांकास घेण्यात येईल.

१५. लेखी परीक्षेच्या निकालपत्रातील गुणवत्तेनुसार एका पदास पाच उमेदवार या प्रमाणात मौखिक परीक्षेकरिता उमेदवार बोलविण्यात येईल.

१६. उमेदवार हा विवाहित असल्यास दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिसरे अपत्य नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत दयावे लागेल. दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिसरे अपत्य असल्यास नियुक्तीकरिता त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

१७. उमेदवारास नियुक्ती मिळाल्यानंतर विहित कालावधीत खात्याची परीक्षा / भाषा परीक्षा संगणक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१८. आरक्षित पदाकरिता उमेदवाराचे जात प्रमाणपत्रांचे, जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याचा विचार राखीव जागेकरिता करण्यात येणार नाही.

१९. प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

२०. अल्प बहिरी व्यक्तीने सुचविलेल्या पदाकरिता अर्ज करावा, मुकबहिर व्यक्तीने अर्ज करुन नये.

२१. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश व परिपत्रकानुसार अपंगाच्या भरतीची प्रक्रिया करण्यात येईल.

२२. उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आवश्यक आहे.

२३. निवड झालेल्या उमेदवरांना विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी नेमणूक दिली जाईल.

२४. टपाल खात्याच्या कोणत्याही विलबांस अथवा टपाल गहाळ झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२५. अर्जाची छाननी केल्यानंतर वैध अर्जदारांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यांत येईल.

२६. शासन सेवेत कार्यरत कर्मचा-यांना मुलाखतीच्या वेळी खाते प्रमुखाचे "ना हरकत प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक राहील.

२७. परीक्षा शुल्क म्हणून मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये २००/- चे धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) (फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे) च्या स्वरुपात अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे. धनाकर्ष सहाय्यक आयुक्त (लेखा), आदिवासी विकास, नागपूर यांचे नावे काढण्यांत यावा. अन्य बँकेचा धनाकर्ष विचारात घेतला जाणार नाही.

२८. अपंग उमेदवाराजवळ किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेले वैद्यकिय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ४० टक्केपेक्षा कमी असलेल्या अपंग व्यक्तींनी अर्ज करु नये.

२९. अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, त्यांनी तसे अर्जासोबत स्वतंत्ररित्या कळविणे आवश्यक आहे.

***मुळ प्रत मा. अपर आयुक्त, यांचे द्वारा अनुमोदित.***

**अपर आयुक्त**
**आदिवासी विकास, नागपूर करिता.**

# अर्जाचा नमुना

---------------------------------- च्या पदाकरिता अर्ज

अपर आयुक्त, आदिवासी विकास, आर.टी. ओ.
कार्यालयासमोर, अमरावती रोड, गिरीपेठ, नागपूर.

पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र येथे स्वत:च्या स्वाक्षरीसह चिकटवावे.

**विषय :- विशेष भरती मोहिमेअंतर्गत अपंग संवर्गातील पदांच्या भरतीबाबत..**

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ------------------------------------------------

२. उमेदवारांचे नाव (आडनांव प्रथम) :- ------------------------------------------------

३. उमेदवाराचा कायमचा पत्ता :- ------------------------------------------------

४. उमेदवाराचा पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता व पिनकोड नंबर :- ------------------------------------------------

५. जन्मतारिख :- दिनांक ------- महिना ------- वर्ष --------------

६. दिनांक --------------रोजी असलेले वय :- ------------------------------------------------

७. जन्माठिकाण :- ------------------------------------------------

८. सेवायोजन /आदिवासी विकास प्रकल्प यांचे नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक व नुतनीकरणाचा दिनांक :- ------------------------------------------------

९. जात :- ------------------------------------------------

१०. जातीचा प्रवर्ग (योग्य पर्यायावर √ अशी खुण करावी) :- अजा अज

११. अपंगाचा प्रकार (योग्य पर्यायावर √ अशी खुण करावी) :- १. अल्पदृष्टी/ मंददृष्टी २. अल्प बहिरी ३. अस्थिव्यंग

१२. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी आहे काय? :- होय नाही

१३. उमेदवार पुरुष आहे की स्त्री आहे :- पुरुष स्त्री

१४. अर्जदार विवाहित आहे काय? :- होय नाही

१५. अर्जदारस दि. ------------- रोजी असलेले अपत्य :-

१६. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड / विदयापीठ | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्के वारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४ थी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | | | |
| २. | एस.एस.सी. | | | | | |
| ३. | एच.एस.सी. | | | | | |
| ४. | पदवी / पदविका | | | | | |
| ५. | पदव्युत्तर (संबधित) | | | | | |
| ६. | इतर शैक्षणिक अर्हता | | | | | |

१७. अर्जासोबत सहपत्रित केलेल्या साक्षांकित प्रमाणपत्राचा तपशिल :-

१.
२.
३.

वर नमुद केलेला तपशिल माझे माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. ज्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझेकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमावण्यास व त्याअनुषंगाने होणा-या इतर कायदेशीर कारवाईस मी पात्र व बांधील राहील. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण : उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

दिनांक :